## जनसंपर्क विभाग

जळगाव प्रतिनिधी (दि. १२ ): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने भैय्यासाहेब उर्फ यशवंतराव भीमराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आज दि. १२ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे विभाग प्रमुख प्रा. राकेश रामटेके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर आंबेडकरी चळवळीची धुरा भैय्यासाहेब उर्फ यशवंतराव आंबेडकर यांनी सक्षमपणे सांभाळली. भारतातील धम्म चळवळीतही भैय्यासाहेब आंबेडकर यांचे मोठे योगदान आहे, एकूणच भैय्यासाहेब आंबेडकर यांनी आंबेडकरोत्तर आंबेडकरी सामाजिक आणि धम्म चळवलीला गती देण्याचे कार्य केल्याचे देखील सांगितले.

या कार्यक्रमास संगीत विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सागर चक्रनारायण, समाजशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. माही फुलबांधे, मंगेश बाविसाने यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. विजय घोरपडे तर आभार सहाय्यक प्राध्यापक डॉ. पौर्णिमा वाहाणे यांनी केले. यावेळी विभागातील मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १२ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता